नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०३/२०२६ (बुधवार )

---

## दुकानाचे शटर फोडुन चोरी करणारे तसेच वाहन चोरी करणारे आरोपी निष्पन्न, ४ गुन्हे उघड
## २ आरोपी अटक, ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक १७/०३/२०२६ स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावनेर उपविभागात उघड न झालेलया गुन्हयांचा तपासांसंदर्भात पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली की, अजनी, नागपुर येथे राहणाऱ्या विधी संघर्षग्रस्त बालकाने त्याच्या ३ साथीदारासह मिळुन सावनेर हद्दीतील दुकाने फोडली आहे. अशी माहीती प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १७/०३/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे नमुद आरोपीचा नागपुर शहरात शोध घेतला अजनी परीसरात नमुद विधीसंघर्षग्रस्त बालक मिळुन आला. त्याला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने त्याचे इतर ०३ साथीदार **आरोपी नामे शुभम उर्फ गब्बु विजय कुशावाह, वय २० वर्ष, रा.किलापुरा सावनेर, ह.मु काचीपुरा, नागपुर, आरोपी नामे अनिश उर्फ ईल्ली निरंजन सिडाम, वय २० वर्ष, रा. आर बी एच बी कॉलनी च्या मागे, काचीपुरा ,नागपुर** आणि एक विधीसंघर्ष ग्रस्त बालक अशा चौघांनी मिळुन पोलीस स्टेशन सावनेर आणि खापरखेडा येथे दुकाने फोडुन चोरी केल्याचे तसेच चंद्रमणी नगर, सावनेर येथुन मोटर सायकल चोरी केल्याचे कबुल केले.

**पोलीसांनी पंचासमक्ष रोख रक्कम किंमती २,०००/— रूपये, गुन्हा करण्यासाठी वापरलेले दुचाकी वाहन ॲक्टीव्हा क्रमांक एम एच २९ ए एक्स ३२३६ असा एकुण**

**५२,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वर नमुद २ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

(१). पो.स्टे. सावनेर अप. क्र. ७४७/२०२५ क.३०५ (अ), ३३१(४) भा.न्या.सं. ,
(२). पो.स्टे. सावनेर अप. क्र. ९६८/२०२५ क.३०५ (अ), ३३१(४) भा.न्या.सं. ,
(३). पो.स्टे. सावनेर ए.सी. क्र. १००७/२०२५ क.३०३ (२) भा.न्या.सं. ,
(४). पो.स्टे. खापरखेडा, नागपुर शहर अप. क्र. ६४१/२०२५ क.३०५ (अ), ३३१(४)भा.न्या.सं.

**असे एकुण ४ गुन्हे उघड झाले आहे.**



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ५० लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक १७/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पोस्टे पारशिवनी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी सिंगोरी शिवार पारशिवनी,खापरखेडा रोड, येथे नाकाबंदी केली असता टाटा कपंनीचा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच—४०/ सी.टि. —६७५५ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक नामे

**भारत अजाबराव परतेती, वय ३५ वर्ष, रा. पेंढरी, कोथुळणा पोस्टे खापा** हा मिळुन आला. ट्रक मालकाचे नाव विचारले असता **२) राजेश गोमकाळे, रा. पारशिवनी** अशी माहीती प्राप्त झाली. तसेच पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) टाटा कपंनीचा १२ चक्का ट्रक क्रमांक एम. एच—४०/ सी.टि. —६७५५ किंमती ५०,००,०००/—रूपये २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण ५०,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी १) भारत अजाबराव परतेती, वय ३५ वर्ष, रा. पेंढरी, कोथुळणा पोस्टे खापा २) राजेश गोमकाळे, रा. पारशिवनी यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रती. अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# वाहनासह ०८ लाख ५५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# पोलीस स्टेशन देवलापार पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक १७/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असताना पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा हिवरा बाजार चौक, नाला येथे अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा हिवरा बाजार चौक, नाला येथे नाकाबंदी केली असता आयसर कंपनीचा विना नंबरचा मुंडा, लाल रंगाची विना नंबरची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रॅक्टर चालक नामे विकेश येणीराम कुमरे, वय २८ वर्ष, रा. बेलदा, ता. रामटेक, जि. नागपूर हा मिळुन आला. ट्रॅक्टर मालकाचे नाव विचारले असता २) सुभाष धंनो भलावी, रा. सावंगी, ता. रामटेक जि. नागपूर** अशी माहीती प्राप्त झाली. तसेच पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १)** आयसर कंपनीचा विना क्रमांकाचा मुंडा किंमती ७,००,०००/—रूपये, त्याला जोडलेली विना क्रमांकाची ट्रॉली किंमती १,५०,०००/—रूपये **२) ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये असा एकुण ८,५५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी १) विकेश येणीराम कुमरे, वय २८ वर्ष, रा. बेलदा, ता. रामटेक, जि. नागपूर २) सुभाष धंनो भलावी, रा. सावंगी, ता. रामटेक जि. नागपूर यांच्या विरूध्द पोस्टे देवलापार येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक १७/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २९६०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत **आरोपी प्रतीक भिमराव डेहनकर, वय २९ वर्ष, रा. खापरी केने** याचेवर १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी **अंतर्गत आरोपी सागर भास्करराव कांबळे, वय ३८ वर्ष, रा. अडेगाव** याचेवर **१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन**

**नरखेड** अंतर्गत आरोपी नारायण लखनसिंग सुर्यवंशी, वय ३४ वर्ष, रा. खापरखेडा, ता. पांढुर्णा याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत आरोपी क्र. १. अश्विन तेजराम पंडेले, वय २६ वर्षे, रा. वडार मोहल्ला सावनेर, त. सावनेर २. सुनिल जिउत भारदवाज, वय १८ वर्षे, रा. महाराजगंज आजमगढ (उत्तरप्रदेश).ह मू सावनेर, ३. ओमप्रकाश भोला शर्मा, वय ४० वर्षे, रा. अलीपूर ग्राम भोजपूर ,बिहार ह. मू. सावनेर यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. तसेच १. देवेंद्र शिवाजी चौधरी, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. २, पटकाखेडी सावनेर २. स्वप्नील वामनराव गावंडे, वय ४० वर्ष, रा. वार्ड नं. ३, कन्याडोल त. कळमेश्वर यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. ३. अमोल बाबा छात्रे, वय २६ वर्ष, रा. पहीलेपार वार्ड नं. १७, सावनेर यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. तसेच १. विनायक माधवराव कवाडकर, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, पारडसिंगा, त. सौसर, जि. पांढुर्णा म. प्र. २. महेन्द्र मनोहर वर्मा, वय ४६ वर्ष, रा. वार्ड क्र. १६, पलीया शाळेजवळ पहलेपार, ता. सावनेर ३. मुकेश गोरेलाल सुर्यवंशी, वय ४४ वर्ष, रा. गुजरखेडी वाघोडा, ता. सावनेर ४. चंद्रशेखर रामाजी चापेकर, वय ५१ वर्ष, रा. छोटी मज्जीदचे बाजूला सावनेर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी शुभम दिंगाबर ढोबडे, वय ३० वर्ष, रा. नंदापुर, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी १. मनिष यंशवतराव वाघमारे, वय ३१ वर्ष, रा. राजुरवाडी, ता. उमरेड २. प्रभाकर झिंगरे मोहिनकर, वय ६० वर्ष, रा. गांगापुर, ता. उमरेड ३. वैभव चंद्रमणी कांबळे, वय ३१ वर्ष, रा. देवळी, ता. उमरेड याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे. **अशा एकुण १७ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १५ गुन्हे दाखल केले आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**